तर काहीं विचारावयाचे नाहीं व मागावयाचे नाहीं असे तर प्रथमपासूनच ठरविले होते. विचारण्याची हिंमतच झाली तर निरंतर सत्संगती कशी मिळेल व मनास शांति व समाधान कसें राहील येवढेंच विचारावयाचे. बाबा पुष्कळांशी गोष्टी बोलत पण त्यावेळीं आम्हास त्या सर्व विसंगतच वाटत. व संताच्या वाक्सरस्वतीची बिल्कूल ओळख नसल्यामुळे कित्येक वेळा तर बाबांचे बोलणे आम्हास अश्लीलही वाटे. तथापि बाबाच्या एकदर वर्तनावरून दररोजच्या कार्यक्रमावरून व अंतर्यामीं स्थिर परंतु क्षणोक्षणीं पालटणाऱ्या असे वरवर दिसणाऱ्या चित्तवृत्तीवरून व पूर्णपणे षड्रिपुदमनावरून बाबाची भाषा नाथांच्या खुणेप्रमाणें उलटी आहे. बाबा हे पूर्ण सगुण ब्रह्म ज्ञानेश्वरावतार आहेत व स्वप्नातील श्री दत्तगुरुमूर्ती ती खास हीच, असे वाटूं लागले. त्या दिवशीं दुपारचे दर्शनानंतर आम्ही तिघे बाहेर फिरावयास गेलो व श्रीबद्दल गोष्टी बोलूं लागलों. अनंत जन्माच्या दुष्ट वासनेने, दुष्ट संगतीने व दुष्ट विचारानें बाष्कळ झालेले मन न स्थिरावतां द्विधा होऊं लागे. मला येथे कांहीं अर्थ वाटत नाहीं. निवळ तुमच्या शब्दामुळें मी येथें आलों, माझे मनांतील गोष्ट सांगतील तर बाबा खरे साधु नाहींतर त्यांच्यात काहीं अर्थ नाहीं. मी स्वतः काहीं विचारणार नाहीं. बाबांनीं होऊनच स्वतः माझे मनांतील गोष्ट सांगितली पाहिजे.असे बीवा म्हणूं लागला. "बाबा साधुपुरुष आहेत. तथापि एका जवळून तीन रुपये एका जवळून दोन रुपये व एका जवळून फक्त एकच रुपया कां घ्यावा ? तसेंच एकास जवळ बैस व दुसऱ्यास दूर बैस असें कां म्हणावें ? ही समदृष्टी कोठली ?" असें उद्गार जनुभाऊ काढीत. मी म्हणे "आपण आजच येथें आलों. सत्पुरुष म्हणजे काय यांची खरी माहिती आपणांस मुळींच नाहीं. त्यांचीं लक्षणें काय ते कसें ओळखावे याचे ज्ञान व लायकी आपले जवळ नाहीं. दिसण्यांत जरी कांहीं गोष्टींत विसंगतता दिसते तरी सत्पुरुषांबद्दल व विशेषतः बाबांबद्दल विरुद्ध चर्चा करण्याची आपण घाई करूं नये. माझेही मन व्यग्र होई परंतु स्वप्नांत पाहिलेली श्री दत्तगुरुची तीच ही मूर्ती आहे अशी पक्की खात्री होत असल्यामुळे व प्रथमदर्शनीं २५ रु. च्या गोष्टीच्या अनुभवामुळें मन पुन्हां उलट

खाई, व बाबांबद्दल उलट बोलणें महापातक आहे असेही वाटे." दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही स्नान करून फिरून श्रीचे दर्शनास गेलो. व श्रीपुढें उभे राहिलों. कै तात्यासाहेब नूलकर आमच्याबरोबर होते. ते श्रीजवळ बसले. मी जरा समोर उभा राहिलों. श्रींनीं तात्यासाहेबांस पुन्हा विचारले, "हे कोण ?" त्यांनी मी अमुक म्हणून सांगितलें. नंतर श्री म्हणाले "मोठे लोक आहेत. पांच पंचवीस रुपये देऊन जावें. पण नाहीं देणार. जाऊं द्या. त्यास बसा म्हणावे." त्याप्रमाणें तात्यासाहेबांनीं मला बसावयास सांगितले. मी बसलों. जवळ बसलों. व श्रीचे पाय चेपूं लागलो. जनुभाऊ व बुवाही खालीं बसले. सुमारें अर्धे तासानें बाबा मला म्हणाले, "तूं जा. आणखी ६ रुपये दे." मी म्हणालों 'होय, देतों.' वाड्यांतून आणून द्या असे मी जनुभाऊस म्हटलें. जनुभाऊ वाड्यांत गेले. जरा वेळ लागला. इतक्यांत बाबा पुन्हा म्हणाले, "दे, दे, लवकर दे" मी म्हणालों, जनुभाऊ वाड्यात गेले अहेत ते आता येतील." श्री म्हणाले, "तूं जा व लवकर घेऊन ये." मी गेलों नोटा होत्या. रोख रुपये नव्हते. व नोटांचे रुपयेही मिळेनात. नंतर मी ५ रुपयांची एक नोट व एक रुपया रोख असे ६ रुपये घेऊन गेलों व ते श्रीचरणीं अर्पण करून वंदन केलें. माधवराव देशपांडे म्हणाले, "बाबा, नोट घ्यावयाची नाहीं ना ?" बाबा म्हणाले, "घे, घे, असूं दे," नंतर माधवरावांनीं त्या नोटीचे रुपये करून आणून मजजवळ दिले व गुरुस्थानास घ्यावयास सांगितलें. मी तसें केलें. नंतर तात्यासाहेब नूलकर मला म्हणाले, "सर्व मंडळी श्रीची पूजा करीत आहेत, तुम्हीही करा." मी म्हणालों "मी पूजेचें सामान आणिलें नाहीं." ते म्हणाले, "माझ्या तबकडींत गंध, अक्षता व फुलें आहेत तीं घेऊन तुम्ही सद्गुरूंची पूजा करा." मी पूजा करण्यास पुढें झालों. इतक्यांत बाबा म्हणाले "कायरे करतोस ?" मी म्हणालों पूजा करतों. श्री म्हणाले "अरे तुझी पूजा झाली, तुजपासून दक्षणाही घेतली असतां कसली पूजा करतोस ?" मी पूजा न करतां तसाच मागें सरलों. श्रीची आरती नैवेद्य वगैरे झाल्यावर आम्ही घरीं आलो. श्रींनीं जनुभाऊजवळ अगर बुवाजवळ दक्षणा मागितली नाहीं. आता आपल्यास बरेच दिवसांनीं जाव-

याचे आहे करिता आज बाबांची आज्ञा घेऊ. असें म्हणून आम्ही तिघेजण सायंकाळीं श्रीचे दर्शनास गेलो. आम्हास पाहिल्याबरोबर प्रथम बाबाच आम्हास म्हणाले, " का जावयाचे का ?" जनुभाऊ म्हणाले, "आपली परवानगी असल्यास जावयाचें." बाबा म्हणाले, "बरे उद्या सकाळीं जा." नंतर दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही पुन्हां श्रीची आज्ञा घेण्यास मशिदींत गेलों. आम्हास पाहताच बाबा पुन्हा म्हणाले, " का जाणार कां ? " आम्ही दोघ मी व जनुभाऊ म्हणालों, " आपली आज्ञा असेल तर जाऊं.' श्री म्हणाले, "जा." नंतर श्रींनीं आमचे तिघांचे कपाळीं उदी लाविली. आम्ही मग पारनेरास गेलों. श्री कुलकर्णी महाराजांचें तेथे दर्शन घेतलें. नंतर नगरास आलों व तेथून केडगांवीं गेलों; परंतु श्री सद्गुरु नारायण महाराज मुंबईस आहेत असें कळलें म्हणून पुण्यास उतरून श्री पर्वती देवीचें दर्शन करून श्री आळंदीस जाऊन श्री इंद्रायणी माईचे स्थान, श्री समर्थ सच्चिदानंद सद्गुरु संत शिरोरत्न ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचें पुण्य दर्शन, पूजा, देव-ब्राह्मण वगैरे करून श्री कवाड क्षेत्रीं श्री समर्थ सद्‌गुरु सखाराम महाराज यांचे पुण्य समाधीचें पवित्र दर्शन करून मुंबईस श्री समर्थ नारायण महाराजांचें दर्शन करून त्याचे आज्ञेप्रमाणें त्यांचे तेथे म्हणजे अंजनीबाईचे बंगल्यांत काशीकर बुवाचें कीर्तन रात्रीं श्रवण करून दुसरे दिवशीं डहाणूस आम्ही सर्व परत गेलो. ज्या अलकापुरीचें दर्शन मनांत उत्कटेच्छा असतांना बहुतकाल होत नव्हतें तें व इतर पवित्र क्षेत्रांचें व पुण्य साधुसंतांचे व दिव्य समाधींचें दर्शन प्रत्यक्ष श्री दत्त ज्ञानेश्वरावतार जे बाबा त्यांचें मधुर दर्शन झाल्याबरोबर कसें झालें, ही गोष्ट वरील हकीकतीवरून कळेल.

आतां निकावलीच्या बुवाचें व माझें प्रथम डहाणूस काय बोलणें झालें, आमच्याबरोबर श्री शिरडीस येतांना त्यानें महाराजांबद्दल काय काय भाषणें केलीं व नंतर आम्ही तिघेही शिरडीस गेल्यावर अंतरसाक्षी श्रींची वागणूक त्याचे संबंधानें कशी व कां होती, प्रत्येकवेळीं बुवास महाराजांबद्दल कसा राग येत असे, तो त्यांचे संबंधानें काय उद्गार काढी, कसा तापे, महाराजांच्या साधुत्वाची परीक्षा तो कोणत्या दृष्टीनें व कोठल्या अटी

वर करीत होता, पुढे तेथे असलेल्या आमचे तीनच दिवसांचे मुक्कामात आम्ही तिघेजण बाबाचे जवळ एके सकाळीं मशिदींत बसलों असतां त्याचेच इच्छेप्रमाणे त्याचे मनांतील गोष्ट तेथे बसलेल्या मंडळींपैकी एकास नेहमी-प्रमाणे प्रश्न करून त्याचे मुखातून सर्वांसमक्ष कशी काढून घेतली. नंतर त्या संबंधानें स्वत: कसे हावभाव केले, नंतर त्या ओघावरून नारायणराव देश-पांडे यानीं श्रीस बुवाबद्दल कसे प्रश्न केले, बाबांनीं त्यास काय उत्तरें दिलीं, इतक्याही गोष्टी पटून बुवाच्या मनाचे समाधान कसें झालें नाहीं, व बुवाने बाबाच्या सांगण्याविरुद्ध वागण्याचे मनात आणिल्यामुळे त्यास कशी अद्दल घडली व त्याचा त्यास कसा अनुभव आला, बाबांबद्दल श्री अंतर्यामी नारायण महाराजांनीं आम्हांस काय सांगितले वगैरे हकीकत फारच रम्य आहे, पण स्थलसंकोचास्तव पुढील खेपेस ती देण्याचें योजिलें आहे.

वर लिहिल्याप्रमाणें इतकाही प्रत्यक्ष कटुतम अनुभव आले तरी खऱ्या संतांची परीक्षा व त्यांच्या दिव्य लीलेचे व अनुभवाचें श्रेष्ठत्व कळत नाहीं. मन निरंतर प्रपंच व्यवसायांतच गुंग. अनंत जन्माच्या अनंत संस्कारामुळें दुष्ट संवयी व दुष्ट खोडींचे बंदे गुलाम. आत्मघातकी वासनांना बळी पड-लेलें. सदा व्यथित व मुग्ध—प्रफुल्लितपणाचा व प्रसन्नतेचा नेहमी अभाव. षड्विकारांस नित्य विकलेलें. आत्मानात्म विचार व विवेक यांची फारकत—म्हणूनच गुरुचरणीं लीन होत नाहीं. गुरुवचनावर दृढ विश्वास रहात नाहीं. ह्या सर्व भयंकर पातक-निधीचे निर्दालन त्या सुरनरसंत चक्रवर्ती श्री सद्गुरु साइबाबांच्या कृपेवाचून होणार नाहीं त्या परम कारुणिक भक्तवत्सल श्री चरणीं खालील एकविंशति वाङ्दुर्वांकुरांची जुडी अनन्यभावें अर्पण करून आपली रजा घेतों.

## पृथ्वीवृत्त

क. न कोण मज मी कळे, परम तत्त्व ना आकळे ।
विकल्प बहु बोकळे, मन मुटे मदा मोकळे ।
भवी भ्रमत दुष्कळें[1] चतुर जन्म-मृत्यु-कळें[2] ।
न साइकरुणे विना दुरित सर्व हें निर्दळे ॥ १ ॥

दुखें उदर दुष्कळे[3] मन तसें दुखें चित्कळे[4] ।
पिशाच सम किंकळे बनवि मोह त्या ठोकळें ।
प्रफुल्ल न, जसे कळे[5] सतत संशयें झांकळें ।
न साइकरुणे विना दुरित सर्व हें निर्दळें ॥ २ ॥

ख. न मोह मद कीं खळे[6] अशुभ जेंवि चंद्रा खळे[7] ।
मला तुडविले खळें[8] महिष जेंवि मर्दी खळे[9] ।
न होत मति-मेखळें[10] स्थिर, सुबद्ध, चित्त खळें ।
न साइकरुणे विना दुरित सर्व हें निर्दळें ॥ ३ ॥

ग. अहंकृति न ती गळे विशद सन्मती डागळे ।
विकार लघु डोंगळे तम[11] मधू पिती आगळे ।
डसूनि तिस[12] पांगळे करित निश्चया वेगळे ।
न साइकरुणे विना [13]दुरित सर्व हें निर्दळें ॥ ४ ॥

घ. न दुष्ट भ्रम [14]ओमळे, विषय वासना पाघळे ।
च. सुमार्गी मन ठेंचळें, प्रभुपदावरूनी चळे ।

---

१ दुष्ट कला २ पुनर्जन्म घेण्याची कला ३ दुष्ट कळ ४ ज्ञानकला ५ फुलाच्या कळ्या ६ कमी होत नाहीं ७ वर्तुळाकार खळे पडतें तें ८ दुष्टानें ९ धान्याचें खळें १० पट्टा-दोरी ११ अज्ञान १२ सद्‌सद्‌विवेकबुद्धि १३ पातक १४ कमी होणें.

त्रिताप-अहि आचळें[1] काढि, [2]शांति गो किचळे ।
न साइकरुणेविना दुरित सर्व हे निर्दळे ॥ ५ ॥

छ. जसा ग्रह[3] विधु[4]स छळे, भवपिशाच माते छळे ।
ज न दीप हार्दि पाजळे, कुडमि मोह माया जळें ।
न लोभ अजुनी जळे, वदन रंगवी[5] काजळें ।
न साइकरुणेविना दुरित सर्व हे निर्दळे ॥ ६ ॥

ट. न कर्मगति ही टळे, न विरमे, स्थिरे, [6]नाठळें ।
ठ. ड. कदापि नच [7]गांठळे, फिरवि सर्व दिग्मंडळे ।
ढ सुनिग्रह सदा ढळे । सुगम पंथ ना आढळे ।
न साइकरुणेविना दुरित सर्व हें निर्दळे ॥ ७ ॥

त. न क्रोधगज शीतळे[8] फिरवितो धरित्री तळें ।
थ. चिरी सुकृत-कोथळे झणि सवेग गंडस्थळें ।
द. विवेक-हरि[9] सादळे[10] भ्रमजलानिलें[11] बादळें ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळे ॥ ८ ॥

मनस्सरस[12] रेंदळें चंड स्मरोर्मि त्या आदळे ।
ध- सुतप्त तनु मोघळे[13] फुटति कीं जसे ओंधळे ।
स्मृतीसि करि आंधळे कुशल बुद्धिही गोंधळे
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळे ॥ ९ ॥

---

१ स्तन. २ शांतिरूप गाय ३ राहू. ४ आकाशस्थ चंद्र. ५ लोभामुळें तोंड काळें होतें. ६ ढळत नाही. ७ वाद न खुंटणे ८ शांत होणे. ९ विवेकरूपी सिंह. १० मलूल होतो. ११ भ्रमरूपी पर्जन्य व वाऱ्याच्या वादळानें. १२ तलाव. १३ कणगे.

न. जलांसि[1] वडवानळें[2] गिरिंराशि[3] दावानळें[4] ।
तनूसि जठरानळें मज तसेंचि कामानळें[5] ।
प. गुरो छळियलें, पळें[6] पथि धनस्त्रिया सापळे ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हे निर्दळे ॥ १० ॥

ममायु[7] मृगि[8] चौपळे[9] मरण-व्याघ्र मागे पळे ?
मुहूर्त घटिका पळे हरुनि काढितो ढेंपळे ।
फ. न दैव अजुनी फळे मलिन जीव हा [10]फाफळें ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळें ॥ ११ ॥

ब. [11]प्रमाद तुडवी बळें मृदु करी जसे कांबळें ।
प्रयत्न जरि ढोब[12]ळें न उठवेंचि बुद्धीबळें ।
करीत मन पाबळे[13] जरि उचंबळें तुंबळें[14] ।
न साइ करुणे विना दुरित सर्व हे निर्दळें ॥ १२ ॥

भ. सुरक्त[15] नव जांभळे, हरितपुष्ट[16] या लेभळे[17];
म. कुतर्क डिरु कोमळे, फुटति [18]हृद्द्रुमीं श्यामळे[19] ।
विरक्ति फल निर्मळें, नच दिसे मदाम्रामळे[20] ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळें ॥ १३ ॥

र. कटुत्व कटुकारलें[21] कठिणता फळें नारळें ।
ल. न कृष्णपण कारळे[22] कधिहि सोडिले, की लळे ?
व. किती पुरविले, वळे[23] कधि न षड्रिपूचे वळे[24] ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळे ॥ १४ ॥

---

१ समुद्रास २ वडवानल अग्नी ३ मोठ्या पर्वताल ४ वणवा ५ वासनारूप अग्नी ६ जर वासनेच्या तडाख्यातून पळेन म्हटलें ७ आयुष्य ८ हरिणी ९ चारीपायांवर पळणें १० घाबरतो ११ उन्मत्तपणा १२ मोठे १३ दुर्बल १४ लढे. १५ लालभडक १६ हिरवे १७ दुर्बल १८ हृदयरूपी झाडाला. १९ काळे २० मदरूपी ढगाच्या मळानें २१ कडु कारलें. २२ काळे तीळ २३ समाधान किंवा तृप्ति होणें २४ वलय, कडे, संघ

स्मरादिरिपु सांवळे,[1] दिसत आवळे[2] जावळे ।
न दोंद कधि मावळे, फुगत रुष्ट सोरावळे ।
कदा न कृश, वावळे शिरिं निबीड की जावळे ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळे ॥ १५ ॥

सुनिर्दय न कोवळे, अति अतृप्त ना गोंवळे[3] ।
न स्वप्नि शुचि सोंवळे, भुजग घातकी ओंवळे[4] ।
सदा अहित चांवळे, प्रखर दर्पना आंवळे ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळे ॥ १६ ॥

श. दुरांस नच ओशळे, सतत मानसीं कोसळे ।
स- न दुर्ग कधि ढांसळे, कधि न श्रांत[8] ना फेंसळे ।
सवेग मनिं हेंसळें, शमवितां वरी ऊसळे ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळें ॥ १७ ॥

ह जसें सहज शाहळें, चिरित लीलया कोहळे ।
जसें अनल आहळे,[10] दहति मक्षिका मोहळें ।
चिरूनि मज, टेहळे[11], पुरवि आपुले डोहळे ।
न साइ करुणे विना दुरित सर्व हे निर्दळें ॥ १८ ॥

तिला फुटति डाहळे, फुटति डाहळ्या टाहळे ।
प्रकांड मग पोहळे[12] नच मरे तुटेना हळें[13] ।
पुनर्जनन सोहळे, चुकति ना तिच्या ओहळे[14] ।
न साइ करुणेविना दुरित सर्व हें निर्दळें ॥ १९ ॥

---

१ काळे दुष्ट २ जोडी. ६ मिळून तीन जोडया एकेकवेळीं एकेक जोडी प्रसवलेली. ३ सुंदर सदय ४ सदोष दुष्ट ५ बोलतात ६ कमी होणें. ७ दुष्ट प्रापंचिक आशा ८ दमलेली ९ फेंस आलेली-थकलेली १० तापाने ११ चोरटे पाहणें १२ पसरतें १३ नांगरानें १४ दुराशारूपी नाल्यांत पडल्यावर.

दुरास अघ डाकिणी सतत सज्ज आंर्ती-खिळें ।
करी धरुनि पाडि गा मन अमोघ दुर्गीं बिळें ।
गिळूनि मग अंतरीं हळुंच घेइ शस्त्रें विळे ।
निमग्न[1] तमिं, कापिते चरचरा मनाचे गळे ॥ २० ॥

वसूनि भवपादपीं विविध त्रिकुती-वागळे ।
अघोर भय काळजी-मळ विसर्जिती, वा गळे ।
ममोपरि सदा न, ये, किळस मन्मना नेटांळे[2] ।
विरक्त न च, डाग द्या जंव न रुपा इंगोळे[3] ॥ २१ ॥

ठाणें १७-९-२५ बाबाचें बाळ

१ अज्ञानांत निमग्न असता २ अडखळत नाहीं ३ अग्नीनें.

॥ श्री साईनाथ बाबा प्रसन्न ॥

सा. नमस्कार वि. वि. मागील अनुभव पाठविलेले पोहोंचलेच असतील. त्यापुढचा हा एक अनुभव पाठवित आहे; तो सवडीनुसार छापून प्रसिद्ध कराल अशी नम्र विनंती आहे. कळावें.

आपला एक दास व बाबाचा दासानुदास, **हरिभाऊ बापुराव शिरसाठे.**

॥ श्री साईनाथबाबाप्रसन्न ॥

१ गेल्या एप्रिल महिन्यांत कोल्हापुरचे रहाणारे माझे एक मित्र बी. ए. ची परीक्षा देण्यासाठीं आले होते. त्यास मी एका गुरुवारीं गुरुमूर्ती रा. काशिनाथमामाच्या घरीं बाबाच्या भजनासाठीं मोठ्या आग्रहानें नेलें. भजनरंगीं आम्ही जसे सर्व मोठ्या प्रेमाने व आनंदाने भजन करूं लागलो, तसे तेही मोठ्या प्रेमानें बाबांचे भजन करूं लागले. भजनानंतर काशिनाथमामास त्यांचा परिचय करून देऊन सांगितलें कीं, हें दोन वर्षें झटून अभ्यास करीत असतांनाही त्यांस परिक्षेत यश येत नाहीं. यावेळीं मामा कांहीं बोलले नाहींत. नंतर दोन दिवसांनीं बाळोबाच्या घरीं वसंतपूजा असतांना ते पुन्हां भजनास आले. त्यावेळीं त्यांची भक्ती पाहून सावित्रीबाई तेंडुलकरांनीं आपल्या मुलास उद्देशून म्हटलेले पद "कृपा करिल तुजवरी । श्रीहरी ॥ धृ० ॥" इत्यादि मामांनीं म्हणून त्यांच्या डोक्यावर हात ठेऊन "बाबा तुला पूर्ण यश देतील, काळजी करूं नको" असें सांगून बाबांची एक लहान छबी व उदी देऊन सांगितले कीं 'पेपर हातांत पडल्याबरोबर बाबांच्या छबीचे दर्शन घेऊन उदी लावून मग पेपर लिहावयास लागावे.' एका पेपराचे वेळीं ते तसें करण्यास विसरले. पेपर लिहूं लागले तो त्यांस कांहीं न सुचून सर्व विचाराचा गोंधळ उडाला. ताबडतोब त्यांनीं बाबांचें दर्शन घेऊन उदी लावून पेपर लिहिण्यास सुरुवात केली. तो पेपर "History Honours" चा होता. मोठ्या आनंदाची गोष्ट ही कीं, माझे मित्र मि. दळवी-ह्यांची परिक्षा ऑनर्समध्ये उत्तीर्ण झाली. तेव्हांपासून ते बाबांची मनापासून भक्ति करूं लागले आहेत. त्यानीं पुण्यास असतांना कांहीं पदें तयार करून बाबांच्या पुढें म्हटलीं, त्यांतलें एक मी खालीं देत आहें. आपणांस योग्य वाटल्यास प्रसिद्ध करावें.

पद:—चाल-अवकाश नाही मज उरला । शरणागत साई तुजला ।। गुरुवरा ।। धृ० ।।
भवतापें जीव हा श्रमला, घ्या पदरी सांई मजला ।। धृ० ।।
षड्रिपु छळती मज अती, नाही त्या मिती, न कथवे
मजला, म्हणूनियां लागे पायाला ।। १ ।। भवतापें ० ।। धृ० ।।
ध्यानमार्गी आड हे मांग, पाजती भांग, कोळुनी
विषयाला, निशा उतरा देउनी तीर्थाला ।। २ ।। भवतापे ।। धृ० ।।
काय सांगू लिडोची नवलाई, स्वरूप भान जाई,
भ्रमाचा घाला ज्ञानबली योग्य विकाराला ।। ३ ।। भवतापें ।। धृ० ।।
भवव्याधी सोसुं किती सांगा । दाह होत अंगा,
कंठ दाटला, कांही उपाय सांगा मजला ।। ४ ।। भवतापें ।।

शिरडीहून रा. रा. माधवराव बळवंत देशपांडे यांचे श्री. हरि सीताराम दीक्षित यांजला आलेल्या ता. १७।९।१० च्या पत्रांतील उतारा:—

( अ ) श्री. समर्थ शरिराने खुशाल आहेत. परंतु परवांचे दिवशीं बुद्धया तिसरे प्रहरचे सुमारास विस्तवावर हात ठेविला. त्या योगानें हात सुजून हातास फापर पडलें आहे. दररोज मलम लावीत असतात. त्यांची लीला ते जाणोत. बाकी आपण असतांना होत होता तसा आनंद चालू आहे.

( ब ) ता. ८।१०। १९१० च्या पत्रांतील उतारा:—

काल रोजीं म्हणजे ता. ७ शुक्रवारीं गणुदासाची बायको ताई इनें आपले वाड्याजवळील आडांत उडी घातली होती. आडास पाणी तीन चार पुरुष होतें परंतु कांहीं लागलें नाहीं. लागलीच मनुष्य उतरून तिजला बाहेर काढिलें, पुष्कळ लोक जमले होते. बिल्कूल लागलें नाहीं.

( क ) ता. ३०।१०।१९१० च्या पत्रांतील उतारा:—

विशेष इकडील मजकूर कीं श्री समर्थांची-प्रकृति चांगली आहे. हात जळालेला अद्यापपावेतो जशाचा तसाच आहे. थोडी सूज उतरली आहे. औषध दुसरें कोणास लाऊं देत नाहींत. आपण स्वत: औषध लावीत असतात. त्यांची लीला ते जाणोत.

( ड ) ता. ९।११।१९१० च्या पत्रांतील उतारा:—

दररोज आरतीचे वेळेस मोरचेल, चवरी, बंदुकीचे बार वगैरे थाटाने चालू आहेत. तसेच रात्रीं चावडींत जाण्याचे वेळेस भाल्दार, चोपदारांची चवरी मोरचेल वगैरेची सुरुवात परवांचे दिवसापासून झाली आहे. आनंदांत असतात.

(रा. रा. नीळकंठराव उर्फ बाबासाहेब सहस्रबुद्धे यांनीं ता. १२-३-११ रोजीं शिरडीहून रा. रा. काकासाहेबांना लिहिलेल्या इंग्रजी पत्राचा अनुवाद).

शिरडीहून जाण्याची परवानगी अद्याप मला कां मिळत नाहीं हें कोडें आतां उलगडलें. कर्टिस साहेब ( त्यावेळीं मध्यभागचे कमिशनर नंतर सर जॉर्ज कर्टिस, व्हाइस प्रेसिडेन्ट गव्हर्नरसाहेबाचें एक्झिक्युटिव्ह कौन्सिल ), त्यांची पत्नी मिसेस कर्टिस, मॅक्लीनसाहेब ( नगरचे कलेक्टर ) व ( रावबहादूर ) आर. एन्. जोगळेकर ( नेटिव्ह असिस्टंट ) ही मंडळी १० तारखेला येथें सकाळीं आली. या मंडळींच्या आगमनाची आगाऊ वर्दी मुळींच नव्हती. कदाचित् त्यांचा हेतु आम्ही येथें राजकीय बाबतींत लुडबुडतों कीं काय हें पाहण्याचाही असेल. कारण ही मंडळी येण्यापूर्वी श्रीनीं एकाएकी रागावल्याचा आविर्भाव अणून आपली कफनी वर केली होती व "क्या देखना हय. हम तो फकीर हय. हमारे पास आगे xx, व पीछे xx हय" असे उद्गार काढले होते. या श्रीच्या उद्गारांचा ही मंडळी आली तेव्हां उमज पडला. अर्थातच आपल्या हुद्याच्या जोरावर श्रींची जमल्यास गांठ घेऊं इच्छिणाऱ्या या मंडळीस मुलाकात झाल्याशिवायच परत जावें लागलें.

ही मंडळी आली त्यावेळीं मी बाळासाहेब भाटे यांचे घरीं होतों. चावडींत येऊन भेटण्याविषयीं जोगळेकरांचा बाळासाहेबांना निरोप आला, परंतु बाळासाहेबांनीं तिकडे दुर्लक्ष केलें. तथापि माझ्या बोलावण्यावरून जोगळेकरच आम्हाला भेटण्यास बाळासाहेबांच्या घरीं आले व नंतर आम्ही सर्वजण चावडींत गेलों. कर्टिससाहेबांनीं व मॅकलीन साहेबांनीं मला बरेचसे प्रश्न विचारले व त्याचे जबाब इतके समाधानकारक दिले गेले कीं जातांनां श्रींना देण्याकरितां मजजवळ दोघां साहेबांनीं प्रत्येकीं रु. ५ व जोगळेकरांनीं रु. २ मिळून रु. १२ दिले. प्रथम श्रींनीं दक्षिणा घेण्याचें नाकारलें व घेतली तेव्हां जवळ बसलेल्या एका गरीबाला देऊन टाकली. त्याच संध्याकाळीं रा. ब. जोगळेकरांना मी एक खळबळजनक पत्र लिहिलें. व आतां मला कमिशनरच्या आफीसांतील एका कारकुनाकडून असें

कळले की ते पत्र मिसेस कर्टिसला फारच चित्ताकर्षक वाटले व त्यांनी ते ठेऊन घेतले. आज मी जोगळेकरांना आणखी एक पत्र मि. व मिसेस कर्टिसना दाखविण्याकरितां पाठवीत आहें. हीं पत्रें बाळासाहेब भाट्याना दाखविलीं होतीं व श्रींच्या परवानगीने पाठविलीं. एकदर सर्व प्रकार फार समाधानकारक झाला. येथे काय मिळूं शकते व ते कसे मिळवावयाचे हे आतां त्या साहेबाना व बाईला कळले आहे आज सकाळीं दुसरें पत्र पाठविण्याविषयीं परवानगी विचारण्यास मी श्रींकडे गेलो होतो तेव्हा श्रींनीं माझ्या मस्तकावर आपला हस्त ठेवून मला विशिष्ट आशिर्वाद दिला.

वरील पत्रासंबंधीं आम्हाला बाबासाहेबांकडून खालीलप्रमाणे ज्यास्त माहिती मिळाली.

ही सर्व मंडळी महाराज निजत असत त्या चावडींत उतरली होती. मंडळी आली त्यावेळीं महाराजांचे तोंड धुणें चालले होतें. तोंड धुणें संपल्यावर नित्यक्रमाप्रमाणे महाराज भिक्षेला निघाले. चावडीपुढे स्वारी आली त्यावेळीं मिसेस कर्टिस चावडीतून खाली आल्या व आदराने महाराजाजवळ येऊन आपल्या धर्मसांप्रदायाप्रमाणें दोन्हीं हात क्रुसाच्या चिन्हाप्रमाणे पुढें धरून म्हणाल्या कीं "आपके साथ कुछ बात करने की हय." तेव्हा "आधा घंटा ठेर जाव" असा महाराजानीं जबाब दिला. भिक्षेहून महाराज चावडीवरून परत जाताना मिसेस कर्टिसने वरीलप्रमाणे जवळ येऊन पुन्हां विचारलें तेव्हां "एक घंटा ठेर जाव" असें महाराज उद्गारले. ती वेळ न्याहरीची होती. त्या मंडळींनां ज्यास्ती सवड नसल्यामुळें भेट न होतां जावे लागलें.

वरील रु. १२ जेव्हा बाबासाहेबांनीं महाराजापुढे केले त्यावेळीं महाराज म्हणाले कीं साहेबाची दक्षिणा तर रु. ३० आहे. साहेबांकडून बाबासाहेबांनां फक्त रु. १०च मिळाले होते त्यामुळे ते बुचकळ्यांत पडले. महाराजांचे बोल वृथा नसावयाचें ही त्यांच्या मनाची खात्री; शेवटीं तपासाअंतीं असे कळले कीं, कर्टिससाहेबांनीं महाराजांना देण्याकरितां प्रथम दोनच रुपये काढले, त्यावर कर्टिसबाईनीं "तुमच्या योग्यतेप्रमाणें तुम्हीं निदान रु. २५ दिले पाहिजेत" असें म्हटले. तेव्हा हे पंचवीस व मॅकलीन साहेबांचे पांच मिळून तीस रुपये आले व चावडीत या प्रमाणें भाषा झाल्याची महाराजांनीं ही खूण दिली.

# अध्याय ३४ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

पूर्वोक्त अध्यायीं उदी महिमान । केलें यथातथ्य कथन ॥
प्रकृताध्यायींही तेंच निरूपण । विवरूं गुणलक्षण पुढारा ॥ १ ॥
तीच मागील कथेची संगती । तेंच उदीचें वैभव संप्रती ॥
श्रोतीं परिसिजे स्वस्थ चित्तीं । सुख संवित्ती प्रीत्यर्थ ॥ २ ॥
रोग दुर्धर हाड्याव्रण । कोण्याही उपायीं होईना शमन ॥
साई हस्तींच्या उदीचें चर्चन । करी निर्मूलन व्यथेचें ॥ ३ ॥
ऐशा या उदीच्या कथा अनेक । दिग्दर्शनार्थ कथितों एक ॥
श्रवण करितां वाटेल कौतुक । अनुभवपूर्वक म्हणोन ॥ ४ ॥
जिल्हा नाशीक मालेगांवीं । डॉक्टर एक पदवीधर पाहीं ॥
होती तयांचे पुतण्यास कांहीं । व्यथा जी राही न औषधें ॥ ५ ॥
स्वयें वैद्य स्नेही वैद्य । केले उपचार नानाविध ॥
कुशल शस्त्रक्रियाप्रबुद्ध । ठकले निर्बुद्ध जाहले ॥ ६ ॥
रोग तो होता हाड्याव्रण । रूढ अपभ्रंश हाड्यावर्ण ॥
व्याधी महादुर्धरविलक्षण । येईना गुण औषधें ॥ ७ ॥
सर्वोपचार देशी विदेशी । झाले फिटली सर्व असोशी ॥
करोनि पाहिलें शस्त्रक्रियेशीं । कांहींही यशस्वी होईना ॥ ८ ॥

पुतण्या तो वयानें लहान। वेदना त्या न होती सहन ॥
कष्ट कासावीस प्राण। उद्विग्न मन आप्तेष्ट ॥ ९ ॥
जाहली उपाय परमावधी। यत्किंचितही शमेना व्याधी ॥
तयास आप्तेष्ट संबंधीं। म्हणती आराधा दैवतें ॥ १० ॥
देवदैवते कुलस्वामी। यांतून कोणीही येईना कामीं ॥
कानीं आलें शिरडी ग्रामीं। अवलिया नामी वसे हें ॥ ११ ॥
ते शिरडीचे संतप्रवर। साई महाराज योगीश्वर ॥
केवळ दर्शनें व्याधी परिहार। करिती साचार परिसिलें ॥ १२ ॥
हेत उपजला साईदर्शनीं। निश्चित केलें मातापितयांनीं ॥
पाहूं हा तरी उपाय करूनी। नांव घेऊनि देवाचें ॥ १३ ॥
म्हणती तो महान अवलिया। तेणें निजहस्तें उदी लाविलिया ॥
दुर्धर रोग जाती विलया। अनुभव घ्यावया काय वेंच ॥ १४ ॥
चला वंदूं तयाचे पाय। करून पाहूं शेवटचा उपाय ॥
तेणें तरी टळो हा अपाय। तरणोपाय हा एक ॥ १५ ॥
असो पुढें ते मातापितर। करूनिया आवराआवर ॥
होऊनि साईदर्शना आतुर। शिरडीस सत्वर पातले ॥ १६ ॥
येतांच बाबांचें दर्शन घेतलें। चरण वंदुनि लोटांगणि आले ॥
दुःख बाळाचें निवेदन केलें। उभे ठेले सन्मुख ॥ १७ ॥
विकळवाणी जोडूनि पाणी। विनटोनी श्रीसाई चरणीं ॥
मुख करोनि केविलवाणी। करिती विनवणी साईशीं ॥ १८ ॥
व्यथा पीडित हें बाळ म्हणती। दुःख न देखवे आम्हाप्रती ॥
सुचे न काय करावें पुढतीं। दिसेना धडगती आम्हातें ॥ १९ ॥
पुत्रदुःखाच्या अवकळा पाहतां। थोर शीणलों साई समर्था ॥
तरी अभयकर योचिये माथां। ठेवून व्यथा निवारावी ॥ २० ॥
परिसोन अपुलें महिमान। केलें आम्ही येथवर आगमन ॥
अनन्यभावें आलों शरण। एवढें जीवदान द्या आम्हा ॥ २१ ॥

तंव तो साईकरुणामूर्ति । आश्वासिता होय तयांप्रती ॥
मशीदीच्या आश्रया जे येती । तयां न दुर्गती कल्पांतीं ॥ २२ ॥
आतां तुम्ही निश्चिंत असा । उदी घ्या त्या व्रणावर फासा ॥
येईल गूण आठांचा दिवसा । ठेवा भरंवसा देवावरी ॥ २३ ॥
मशीद नव्हे ही द्वारावती । येथें जयांचे पाय लागती ॥
तात्काळ क्षेम आरोग्य पावती ॥ येईल प्रतीती तुम्हांही ॥ २४ ॥
येथें येतां आराम न पडे । हें तो कालत्रयींही न घडे ॥
जो या मशीदीची पायरी चढे । तयाचे बेडे पार जाणा ॥ २५ ॥
पुढें बाबांचे आज्ञे करून । व्यथितास सन्मुख बैसवून ॥
घायावर बाबांनीं हात फिरवून । कृपावलोकन तें केलें ॥ २६ ॥
व्यथा ही तो केवळ दैहिक । असेना का ती दैवीक ॥
अथवा दुर्धर मानसीक । समूलहारक दर्शन ॥ २७ ॥
पाहोनि श्रीसाईचें मुख । ठायींच विरालें सकळ दुःख ॥
सेवन करितांच वचन पीयूष । परम सुख रोगिया ॥ २८ ॥
असो पुढें ते तैसेच तेथ । राहिले चार दिवसपर्यंत ॥
गेला व्याधीस आराम पडत । विश्वासही जडत साईपदीं ॥ २९ ॥
तदनंतर तीं तिघेंजणें । बाबांचिया पूर्ण अनुमोदनें ॥
परतलीं आनंद निर्भरमनें । संतुष्टपणें गांवासीं ॥ ३० ॥
हा काय लहान चमत्कार । हाडव्याव्रणास पडला उतार ॥
उदी आणि कृपेची नजर । हाच कीं उपचार अपूर्व ॥ ३१ ॥
ऐसें हें महापुरुष दर्शन । भाग्यें लाधतां आश्वासन ॥
कल्याणकारक आशिर्वचन । तेणेंच निर्मूलन व्याधींचें ॥ ३२ ॥
असो कांहीं दिवस जातां । उदी व्रणावर लावितां सेवितां ॥
घाय भरला सुकतां सुकतां । लाधला आरोग्यता* तो मुलगा ॥ ३३ ॥

* ठाणें जिल्ह्यांत बेलापुराजवळ तुरभें गांवी शांताबाई या नांवाची बाई राहत असते: तिच्या डाव्या हाताच्या आंगठ्यास हाडव्याव्रण झाला होता.

ऐकून मालेगांवीं हें चुलता । साईदर्शनीं उपजली उत्सुकता ॥
मनीं म्हणे मुंबईला परततां । पुरवूं आतुरता एवढी ॥ ३४ ॥
पुढें मुंबईलागीं जें निघती । मालेगांवीं मनमाडावरती ॥
घातला कोणीं विकल्प चित्तीं । निश्चय त्यागिती शिरडीचा ॥ ३५ ॥
सत्कार्याची ऐसीच रीती । आरंभीं कुत्सित जन मोडा घालिती ॥
लोकप्रवादा बळी न पडती । अंतीं सद्गती तयांसची ॥ ३६ ॥
मग ते संत दर्शन डांवलुनी । गेले थेट मुंबई लागुनी ॥
उरली रजा आलीबागेस राहुनी । भोगावी मनीं हा संकेत ॥ ३७ ॥
ऐसा निश्चय जाहल्यावरी । तीन रात्रीं हारोहारी ॥
ऐकिला, ध्वनी निद्रे माझारी । 'अजून मजवरी अविश्वासना' ॥३८॥
लागोपाठ ही अशरीर वाणी । ऐकूनि डॉक्टर विस्मित मनीं ॥
निश्चय केला शिरडी प्रयाणीं । अन्वर्थ ध्वनी वाटला ॥ ३९ ॥
परी एकासी दूषित ज्वर । डॉक्टरांचेच तया उपचार ॥
तयास आराम पडलीयावर । निघणे सत्वर ठरविलें ॥ ४० ॥
परी तो ज्वर मोठा प्रखर । गुणा न येती कांहीं उपचार ॥
पडे न लवमात्रही उतार । घडे न सत्वर निर्गमन ॥ ४१ ॥
मग ते मनीं करिती निर्वाण । जरी आज यास येईल गुण ॥
तरी मी उद्यांच न दडवितां क्षण । शिरडीस प्रयाण करीन ॥ ४२ ॥

---

तो सात वर्षें होता. एके रात्रीं महाराजांनीं तिला स्वप्नांत जाऊन सांगितलें 'तूं डिकेमाली लाव.' बाई जागी झाली तों तिला मोठा आनंद वाटूं लागला. व तिनें व्रणाला डिकेमाली लावली व तिचा व्रण बरा झाला. तिनें मग या सर्व मजकुराचें कार्ड महाराजांस लिहून पाठविलें. त्या कार्डावर तारीख १ सप्टेंबर १९१८ ही आहे.

१ मालेगांव आणि मनमाड या दोन्ही ठिकाणीं. २ घ्यावयाचें सोडून. ३ लागोपाठ.

ऐसा करितां दृढ संकेत । महिना दो महिने उलटत ॥
जाहला सफल तयाचा हेत । निघाले शिरडीप्रत डॉक्टर ॥ ४३ ॥
यथा संकल्प शिरडीस गेले । मनोभावें चरण वंदिले ।
बावांहीं अंतरीचे अनुभव पटविले । लक्ष जडविले निजसेवे ॥ ४४ ॥
मस्तकीं हस्त साशिर्वाद । ठेविला दिधला उदीप्रसाद ॥
पाहूनि साईचा महिमा अगाध । विस्मयाविष्ट जाहले ॥ ४५ ॥
राहिले तेथें चार दिवस । परतले डाक्टर आनंद मानस ॥
पुरे न होतां पंधरा दिवस । गेले विजापुरास बदलीवर ॥ ४६ ॥
हाडच्या व्रणाचिया ओढी । आली साई दर्शन परवडी ॥
जडली संतचरणीं गोडी । जोडिली जोडी असरी ॥ ४७ ॥
असेच एकदां डॉक्टर पिल्ले । नारू व्यथेनें व्याकूळ झाले ॥
एकावर एक सात झाले ॥ बहुत कष्टले जीवाला ॥ ४८ ॥
साईबाबांचें भारी प्रेम । ' भाऊ ' आवडतें टोपणनाम ॥
भाऊचें नित्य कुशल क्षेम । पुसावे परम आवडीनें ॥ ४९ ॥
मशिदीमाजी सांजसकाळ । कठड्या सन्निध भाऊचें स्थळ ॥
भाऊपाशीं बहुत काळ । गोष्टींचा सुकाळ परस्परा ॥ ५० ॥
भाऊ पाहिजे चिलीम ओढितां । भाऊ पाहिजे विडी फुंकितां ॥
भाऊ पाहिजे न्याय निवडितां । जवळ नसतां करमेना ॥ ५१ ॥
असो ऐसी तयांची कथा । दुःसह होऊनि नारूची व्यथा ॥
भाऊनीं अंथरूण धरिलें विकलता । दुःखाद्वेगता दुर्धर ॥ ५२ ॥
ऐसा तो प्रसंग दारुण । मुखीं साई नाम स्मरण ॥
पुरे यातना बरें तें मरण । पातले शरण साईतें ॥ ५३ ॥
पाठविती बाबांस सांगून । कंटाळलों हें दुःख भोगून ॥
काय हे किती आंगाला व्रण । नाहीं मज त्राण सोसावया ॥ ५४ ॥

शुद्धाचरणें वर्ततां । कां मजला हे दुःखावस्था ॥
दुष्कर्मांच्या वाटे न जातां । कां मम माथां पाप हे ॥५५ ॥

मरणप्राय नारूच्या वेदना । बाबा न आतां सोसवती आपणां ॥
याहून आतां येऊं द्या मरणा । भोगीन यातना पुढारा ॥ ५६ ॥
भोगिल्यावीण नाहीं गती । आणिक जन्म घेऊं लागती ॥
परी प्रारब्धभोग कधींही न चुकती । मीही मंदमती हें जाणें ॥ ५७॥

सुखे घेईन दहाजन्म । तेथें हें भोगीन माझें कर्म ॥
कराया प्रकृत जन्माचा उपरम । एवढा हा धर्म मज वाढा ॥ ५८ ॥

पुरे आतां या जन्माचें जिणें । सोडवा मज जीवेंप्राणें ॥
नको आतां हे कष्ट सोसणे । हेंच मागणें मागतों ॥ ५९ ॥

परिसून प्रार्थना सिद्धराणा । दया उपजली अंतकरणा ॥
डॉक्टर पिल्लयांचिया समाधाना । वर्षले करुणामृत तें सेवा ॥ ६० ॥

मग भक्तकाम कल्पद्रुम । पाहूनि दुःखावस्था ती परम ॥
करावया लागी तीचा उपशम । काय उपक्रम मांडिला ॥ ६१ ॥
निरोप आणिला दीक्षितांनीं । बाबांनीं तें वृत्त परिसुनी ॥
म्हणाले सांग तयास जाऊनी । निर्भय मनीं राही तूं ॥ ६२ ॥
आणिक तयास पाठविती सांगूं । किमर्थ दहा जन्मांचा पांगू ॥
अवघ्या दहा दिवसाचा भोगू । भोगूं विभागून परस्पर ॥ ६३ ॥
मोक्ष स्वार्थ वा परमार्थ । द्यावया मी असतां समर्थ ॥
हाच का तुझा पुरुषार्थ । मरणानर्थ मागसी ॥ ६४ ॥
आणवा तयास उचलूनी । भोग हा साहूं कीं तो भोगूनी ॥
जावें न ऐसें गांगरूनी । आणावा मारूनि पाठीवर ॥ ६५ ॥

असो डॉक्टर ऐसिये स्थिती । आणिले तात्काल मशिदीप्रती ॥
पाठीचा तक्या काढुनी हातीं । दिधला तयांप्रती बाबांनीं ॥ ६६ ॥
ठेविला आपुले सव्यभागीं । फकीर बाबा बैसत ते जागीं ॥
म्हणाले टेकून पड ये उगीं । चिंता वाउगीं करूं नको ॥ ६७ ॥
करी स्वस्थ लांब पाय । जेणें तुजला आराम होय ॥
संचित संपेना भोगिल्या शिवाय । खरा उपाय तो हाची ॥ ६८ ॥
इष्टानिष्ट सुखदुःख । संचितानुसार अमृत वा विख ॥
हें प्रवाहपतित द्वंद्व देख । धरीन हरिख वा शोक ॥ ६९ ॥
जें जें येईल तें तें साहे । अल्ला मालीक वाली आहे ॥
सदा तयाच्या चिंतनी राहे । काळजी वाहे तो सारी ॥ ७० ॥
चित्त वित्त काया वाणी । सहित रिघावें तयाचे चरणीं ॥
असतां निरंतर तयाचे स्मरणीं । दिसेल करणी तयाची ॥ ७१ ॥
तंव ते वदती पिल्ले डॉक्टर । पट्टी बांधिती नारूवर ।
नानासाहेब चांदोरकर । परी न उतार कांहींच ॥ ७२ ॥
बाबा म्हणती नाना पागल[1] । पट्टी सोड तूं मरशील ॥
आतां काऊ[2] येऊन टोंचील । मग तूं होशील चांगला ॥ ७३ ॥
असो ऐशा वार्ता चालतां । अब्दुल[3] आला तात्काल वरता ॥
पणत्यांत तेल घालावयाकरितां । काय अवचिता तैं घडलें ॥ ७४ ॥
मशीद आधींच ती सांकड[4] । भक्तांची होत बहुत भीड ॥
त्यांतची पिल्ले यांची गडबड । वावरूं[5] अवघडला अब्दुल ॥ ७५ ॥
अब्दुल्ला निजकार्यीं दक्ष । पणत्यांकडे तयाचें लक्ष ॥
तेणें पिल्यांकडे जाहलें दुर्लक्ष । प्रकार विलक्षण घडला त ॥ ७६ ॥

१ वेडा. २ कावळा. ३ मशिदींत दिवाबत्ती करणारा श्रींचा एक भक्त. ४ थोडया जागेची दाटी. ५ पाऊल टाकावयास.

अब्दुल्ला तरी करील काय । होणारापुढे नाहीं उपाय ॥
पिल्यानीं लांबविला होता जो पाय । चुकून पाय पडला वरी ॥७७॥
आधींच पाय होता सुजला । तेथेंच अब्दुलचा पाय पडला ॥
मग पिल्ल्यांनीं जो ठणाणा केला । अति कळवळला जीव तें ॥ ७८ ॥

---

१ अबदुलभाई हा नादेडचा राहणारा असून महाराजाचे समाधीचे आधीं नऊ दहा वर्षांपासून शिर्डीसच सेवेसाठी येऊन राहिला आहे. समाधी नंतरही काहीं मुशाहिरा न घेता फक्त अन्नवस्त्र घेऊन सेवा करीत राहिला आहे. महाराज देहधारी असताना त्याजवर अत्यंत काम पडत असे व तें सर्व तो मोठ्या प्रेमाने करीत असे नेहमीं चावडींत राहत असे व आतां समाधी-पाशींच खोलींत राहतो. रात्रीसुद्धा विश्रांती न घेता कुराण पढण्यांतच बराच वेळ घालवीत असे आणि अजूनहि तोच क्रम त्याचा चालू आहे. घरीं त्याची आई, बायको व मुलगा इतकी मंडळी आहेत पण त्यांना सर्वांना सोडून तो शिर्डीस राहिला आहे. त्याची आई व मुलगा कधीं कधीं शिर्डीस येतात. बायकोही एकदां आली होती पण तो त्यापैकीं कोणाचेही मोहांत न पडतां सेवा करीत तेथेच असतो. त्याच्या मुलाच्या लग्नाची काळजी त्याच्या आईला फार वाटत असे व तिने एके ठिकाणीं जुळविण्याची शिकस्त केली पण अबदुलभाई फकीर झाला आहे. त्याच्या तेथें आमची मुलगी द्यावयाची नाहीं असा रोकडा जबाब मिळाला. त्यानंतर ती बाई तेथें आली व महा-राजांजवळ गाऱ्हाणे केलें. महाराज म्हणाले सबुरी धर. घाबरूं नको. मुलाला चांगली मुलगी मिळेल व तें आपोआप जमून येईल. अर्थात महाराजांचे म्हणण्याप्रमाणें घडून आलें.

एकदां अबदुलभाईची आई व मुलगा एका गांवाला गेले असतां तेथें एका गृहस्थाची गाठ पडली व त्याने आपण माझी मुलगी करा असा आग्रह धरिला. त्याला काहीं मंडळींनीं सांगितले कीं मुलाचा बाप फकीर झाला आहे. त्यावर तो म्हणाला मीही फकीर झालों तरी हरकत नाहीं. माझी मुलगी मी या मुलालाच देणार. त्याप्रमाणें तें लग्नही ताबडतोब उरकून घेतलें. त्या

मारिली एकदांची किंकाळी । मस्तकीं जाऊनि भिनली कळी ॥
विनवीत बाबांस बद्धांजुळी । करुणा समेळीं तें परिसा ॥ ७९ ॥
नारू फुटून वाहूं लागती । पिल्ले अत्यंत अस्वस्थ चित्तीं ॥
एकीकडे आक्रोश करिती । नारू अनुसरती दुसरीकडे ॥ ८० ॥
करम कर मेरे हाल परतू करीन । तेरा नाम रहिमान है और रहीम ॥
तूंही दोनों आलमका सुलतान है । जहांमें नुमाया तेरी शान है ॥
फना होने वाला है सब कारोबार । रहे नूर तेरा सदा आशकार ॥
तूं आसिकका सदा मदतगार है ।
राहून राहून उठतसे कळ । जीव कळवळला पडे विकळ ॥
साईबाबांचा हा खेळ । झाली अटकळ सर्वांची ॥ ८१ ॥
बाबा वदती पहा भाऊ । लागला बरें आतां गाऊं ॥
पिल्ले तयांस पुसती तो काऊ । अजून खाऊं येणार का ॥ ८२ ॥
तेव्हां बाबा वदती तूं जाई । स्वस्थ वाड्यांत पडून राहीं ॥
आतां काऊ फिरून नाहीं । येणार पाहीं टोचावया ॥ ८३ ॥
तोच नाहीं का येऊन गेला । तोच तो ज्याणें पाय दिधला ॥
तोच तो काऊ टोंचून पळाला । नारू तळाला घातला ॥ ८४ ॥
कैचा काऊ आणि कावळा । होणार वृत्तांत समक्ष घडविला ॥
काक अब्दुलारूपें प्रकटला । केलें बोला अन्वर्थ. ॥ ८५ ॥
बोल नव्हे तो ब्रम्हलेख । कर्मावरीही मारील मेख ॥
अल्पावकाशेंच भाऊस देख । लागलें सुख वाटावया ॥ ८६ ॥
उदीलेपन उदीसेवन । हेंच औषध हेंच अनुपान ॥
जाहलें समूळ रोग निरसन । उगवला जों दिन दहावा ॥ ८७ ॥

---

गृहस्थाची एक मोठी मुलगी लग्नाची होती तिचें लग्न जुळलें होतें पण लग्न व्हावयाला अवकाश होता तरीही त्यानें न थांबता धाकट्या मुलीचें लग्न अबदुलभाईच्या मुलाशीं तावडतोब करून टाकलें.

१ जगतांत.

निघाले सजीव सप्तजंतू । जखमा माजील बारीक तंतू ॥
वेदना दुर्धर जाहल्या शांतू । दुःखासीं अंतू जाहला ॥ ८८ ॥
जाणोनि ऐशिया चमत्कारा । पिल्ले साश्चर्य जाहले अंतरा ॥
नेत्र स्रवले प्रेमधारा । पाहोनि उदारा[१]चरितें ॥ ८९ ॥
बाबांचिया चरण संपुटीं । पिल्ले तेथेंच घालिती मिठीं ॥
बाष्पावरोध जाहला कंठी । फुटे न ओष्ठी कीं वाचा ॥ ९० ॥
सांगून आणीक एक अनुभव । करूं हा संपूर्ण उदीप्रभाव ॥
जया मनीं जैसा भाव । हाच या गौरव ग्रंथाचा ॥ ९१ ॥
एकदां माधवराव ज्येष्ठ । बापाजी तयांचा बंधू कनिष्ठ ॥
कैसें तयावरी येतां अभीष्ट । उदीनें अभीष्टं[२] पावले ॥ ९२ ॥
ऐसा या उदीचा प्रभाव । किती वानावा म्यां नवलाव ॥
ग्रंथि ज्वरादि रोग सर्व । औषध अपूर्व नाहीं दुजें ॥ ९३ ॥
असतां साऊळ[३] विहिरीवर । कुटुंबासीं आला ज्वर ॥
ग्रंथी उद्भवल्या जांघेवर । मनीं घाबरला बापाजी ॥ ९४ ॥
पाहून कुटुंब अति हैराण । तैसाच रात्रीचा समय भयाण ॥
जाहला बापाजी भ्रांतमन । गळालें अवसान तयाचें ॥ ९५ ॥
धांव ठोकिली रातोरात । सकंप भयभीत शिरडीस येत ॥
जाहला कथिता समस्त वृत्त । निजबंधूप्रत तेथवां ॥ ९६ ॥
म्हणती आल्या दोन गांठी । ज्वर संतप्त झालीसे कष्टी ॥
चला पहा कीं अपुल्या दिठी । दिसे न गोठी मज बरवी ॥ ९७ ॥
बापाजी बोलतां केविलवाणी । माधवरावजी दचकले मनीं ॥
गेलें पळोनी तोंडचें पाणी । मन ठिकाणीं पडेना ॥ ९८ ॥
माधवराव मोठे विवेकी । ग्रंथी म्हणतां भरली धडकी ॥
ग्रंथिज्वरांची तडकाफडकी । आहेच ठाउक कीं अवघियां ॥ ९९ ॥

१ उदार कृत्य-२ चिंतलेला हेतू ३ शिरडी नजीक एक ठिकाण.

प्रसंग बरवा वा विकट । कार्य असो इष्टानिष्ट ॥
आधीं साईस पुसावी वाट । परिपाठ हा धोपट शिरडींत ॥ १०० ॥
मग ते जैसें जेंव्हें कथिती । आचरावें तैसें स्थितीं ॥
तेच भक्तसंकट निवारिती । वर्णावे किती अनुभव ॥ १०१ ॥
असो या नित्य पाठानुसार । माधवरावही करिती विचार ॥
आधीं बाबांस केलें हें सादर । साष्टांग नमस्कारपूर्वक ॥ १०२ ॥
म्हणती जयजय साईनाथा । दया करावी आम्हां अनाथा ॥
हें संकट काय ओढवलें आतां । नसती चिंता उद्भवली ॥ १०३ ॥
तुजवांचून कवणा आना । आम्ही जाऊं कराया याचना ॥
दूर करी त्या पोरीच्या यातना । आशिर्वचना देई गा ॥ १०४ ॥
करी एवढें संकट हरण । आम्हां कैवारी कोण तुजवीण ॥
करी या दुर्धर ज्वराचें शमन । ब्रीद संरक्षण करी गा ॥ १०५ ॥
पुसती अनुज्ञा जावयास । बाबा वदती तंव तयास ॥
नको जाऊं अपरात्रीस । उदी दे तियेस पाठवुनी ॥ १०६ ॥
कशाच्या ग्रंथी कशाचा ताप । आपुला अल्ला मालिक बाप ॥
बरें होईल आपोआप । होईल सुखरूप निर्धोर ॥ १०७ ॥
मात्र तूं सकाळीं सूर्योदयीं । साऊळ विहिरीस जाऊन येई ॥
आतांच नको जाण्याची घाई । स्वस्थ राही तूं येथें ॥ १०८ ॥
उदईकही जाऊन यावें । नलगे निरर्थक कुचंबावें ॥
उदी लावितां सेवितां भावें । किमर्थ भ्यावें आपण ॥ १०९ ॥
परिसतां हें बापाजी भ्याला । तयाचा मोठा हिरमोड झाला ॥
माधवराव जाणती औषधीपाला । परी न समयाला उपयोग ॥ ११० ॥
एक साई कृपेवीण । औषधीस नाहीं गुण ॥
हें एक वर्म ही एक खूण । माधवराव पूर्ण जाणती ॥ १११ ॥

आज्ञा बाबांची वंदून । उदी दिधली पाठवून ॥
राहिले माधवराव स्वस्थ मन । परतला उद्विग्न बापाजी ॥ ११२ ॥
पाण्यांत उदी कालवून । पोटांत पाजिली अंगा लाऊन ॥
घाम सुटला डवडवून । निद्रा लागून राहिली ॥ ११३ ॥
सूर्योदय जाहल्यावरी । कुटुंबास वाटली हुषारी ॥
नाहीं ज्वर ना गाठी विषारी । बापाजी करी आश्चर्य ॥ ११४ ॥
इकडे माधवराव जे उठले । शौच मुखमार्जन आटपलें ॥
साऊळ विहिरीस जावया निघाले । दर्शना आले मशिदीं ॥ ११५ ॥
घेतलें बाबांचे दर्शन । घातलें पायीं लोटांगण ॥
उदी समवेत आशिर्वचन । मिळतांच तेथून निघाले ॥ ११६ ॥
मशिदीची पायरी उतरतां । बाबा तयांस ऐकिलें आज्ञापितां ॥
' शामा उठाउठी ये मागुता । विलंब लागतां कामा नये ' ॥ ११७॥
असेल कीं भावजयी विव्हळ । कैशी साहील दो ग्रंथींची जळजळ ॥
पडली असेल करीत तळमळ । वाटेनें हळहळ दीरास ॥ ११८ ॥
करिती बाबा कांहीं इषारा । कां ये सत्वर म्हणती माघारा ॥
तेणें शामा होय घाबरा । चाले झरझरा मार्गानें ॥ ११९ ॥
घाई घाई साऊळ विहिर । गांठेपर्यंत नव्हता धीर ॥
पाऊल ठेवितां उंबरठ्यावर । चमत्कारले अंतरीं ॥ १२० ॥
जियेस गतरात्रीं ग्रंथीज्वर । चहा ठेवितां पाही चुलीवर ॥
माधवराव विस्मितांतर । जाहले स्थित्यंतर पाहुनी ॥ १२१ ॥
तंव ते बापाजीस पुसत । ही तो नित्य व्यवसायरत ॥
बापाजी म्हणे ही सर्व करामत । उदीची निश्चित बाबांच्या ॥१२२॥
म्हणे मी येतांच उदी पाजिली । चोळून चोळून सर्वांगा चर्चिली ॥
तात्काळ घर्माचित तनू झाली । निद्रा लागली स्वस्थपणें ॥ १२३ ॥

पुढें जंव सूर्योदय होत । उठूनी बैसली खडखडीत ॥
ग्रंथी विराल्या ज्वरासहित । हें सर्व चरित साईचें ॥ १२४ ॥
शामा पाहूनि ऐसी स्थिती । तात्काळ आठवली साईंची उक्ती ॥
" उठाउठीं येई तूं मागुती " । साश्चर्य चित्तीं जाहला ॥ १२५ ॥
जाग्या आधींच कार्य संपलें । चहा घेऊन माधवराव परतले ॥
मशिदींत जाऊन पहिले । चरण वंदिले बाबांचे ॥ १२६ ॥
म्हणती देवा काय हा खेळ । तूंचि उडविसी मनाची खळबळ ॥
बसल्या जागीं उठविशी वाहुटळ । मागुती निश्चळ तूंची करिसी १२७
बाबा तयास प्रत्युत्तर देती । पहा कर्माची गहन गती ॥
मी करी ना करवी कांहींही निश्चिती । कर्तृत्व मारिती मजमाथां १२८
कर्में जीं जीं अदृष्टें घडत । मी तो तेथील साक्षीभूत ॥
कर्ता करविता तो एक अनंत । कृपावंतही तो एक ॥ १२९ ॥
मी ना देव ना ईश्वर । मी ना 'अनल हक्क' ना परमेश्वर ॥
' यादे हक्क ' मी यादगार । बंदा मी लाचार अल्लाचा ॥ १३० ॥
सांडूनिया अहंकार । मानूनि तयाचे आभार ॥
तयावरी जो घालील भार । बेडा तो पार होईल ॥ १३१ ॥
असाच एका इराणीयाचा । अनुभव ऐका महत्वाचा ॥
तयाच्या तान्ह्या मुलीची वाचा । बसतसे तासा तासास ॥ १३२ ॥
तासा गणित आकडी येई । पडो धनुकडी होऊन ठायीं ॥
अत्यावस्था बेशुद्ध होई । उपाय कांहीं चालेना ॥ १३३ ॥
पुढें तयांचा एक मित्र । वर्णी तयास उदीचें चरित्र ॥
म्हणे ऐसें रामबाण विचित्र । औषध अन्यत्र असेना ॥ १३४ ॥
जावें अविलंबें पारल्यास । उदी मागावी दीक्षितांस ॥
असे तयांचे संग्रहास । अति उल्हासता देतील ॥ १३५ ॥
ती उदी मग रोज थोडी । साईस्मरण श्रद्धा आवडी ॥
पाजितां ही जाईल आंकडी । सौख्य परवडी लाधाल ॥ १३६ ॥

ऐसें ऐकून प्रभ तो पारशी । उदी मागून दीक्षितांपाशीं ॥
पुढीस पाजितां नित्यनेमेंसीं । आरोग्य तिजसीं लाधलें ॥ १३७ ॥
तासातासां जी होतसे घावरी । तात्काळ उदीनें जाहली बरी ॥
जाऊं लागले मध्यंतरी । लहरी लहरींत सात तास ॥ १३८ ॥
तासातासानें येणारी लहर । पडतां साता तासांचें अंतर ॥
काहीं काळ क्रमिलियानंतर । *परिहार समग्र जाहला ॥ १३९ ॥
हड्यानिजीक एका गावांत । रहातसे एक वृद्ध गृहस्थ ॥
मुतखड्याच्या व्याधीनें ग्रस्त । जाहला त्रस्त अतिशय ॥ १४० ॥
हा रोग शस्त्रक्रियेवीण । अन्यथा नाहीं याचें निवारण ॥
म्हणूनि शस्त्रक्रियाप्रवीण । पहा तरी कोण जनवदती ॥ १४१ ॥
रोगी परम चिंतातूर । कर्तव्यार्थी न सुचे विचार ॥
मरणोन्मुख कृश शरीर । दुःख अनिवार सोसेना ॥ १४२ ॥
शस्त्रप्रयोगा लागे धैर्य । रोगिया अंतरीं नाहीं स्थैर्य ॥
सुदैवें तयाचें नष्टचर्य । संपलें आश्चर्य तें परिसा ॥ १४३ ॥
एरीकडे हा ऐसा प्रकार । तोंच त्या ग्रामीचे इनामदार ॥
साईबाबांचे भक्त थोर । आले गांवावर समजलें ॥ १४४ ॥
तयांपाशीं बाबांची विभूती । नित्य राही हें सर्व जाणती ॥
रोगार्तांचे आप्तेष्ट येती । उदी प्रार्थिती तयांतें ॥ १४५ ॥
इनामदारांनीं उदी दिधली । मुलानें बापास पाण्यांत पाजिली ॥
ही मिनिटें नसतील लोटलीं । तोंच कीं वर्तली नवलपरी ॥१४६॥
उदी प्रसाद अंगीं जों भिनला । मूतखडा ठायींचा ढळला ॥
मूत्रद्वारें बाहेर निसटला । आराम पडला तात्काळ ॥ १४७ ॥
मुंबापुरीचे एक गृहस्थ । होते जातीचे प्रभु कायस्थ ॥
होतां प्रसूति समय प्राप्त । स्त्री अत्यावस्थ सर्वदां ॥ १४८ ॥

* या उदीचे असे अनेक अनुभव आहेत.

मग कितीही उपाय करा । गुण न एकाही उपचारा ॥
बाईचा जीव होतसे घाबरा । ऐसा विचारा ग्रासला ॥ १४९ ॥
श्रीराममारुती नामें विख्यात । होते एक साईचे भक्त ॥
त्यांच्या विचारें हे गृहस्थ । जावया शिरडीप्रत निघाले ॥ १५० ॥
प्रसूतीचा येतां समय । महत् संकटीं पडत उभय ॥
जाहला एकदां मनाचा निश्चय । पावूं निर्भय शिरडींत ॥ १५१ ॥
होणार होईना का निदानीं । होवो तें बाबांचें संनिधानीं ॥
ऐसा संकल्प दृढ करोनी । शिरडीस येऊन राहिले ॥ १५२ ॥
ऐसेंही उभयता कित्येक मास । करिती जाहलीं शिरडींत वास ॥
पूजा अर्चा साईसहवास । आनंद उभयांस जाहला ॥ १५३ ॥
ऐसा क्रमितां कांहीं काळ । प्रसूति समय आला जवळ ॥
काळजी उद्भवली प्रबळ । संकट टळणार कैसें हें ॥ १५४ ॥
ऐसें म्हणतां म्हणतां आला । प्रसूतीचा दिवस पावला ॥
गर्भद्वाराचा मार्ग अडला । सर्वांस पडला विचार ॥ १५५ ॥

---

नारायण गोपिनाथ दिघे या नांवाचे गृहस्थ मुंबईंत राहात असत. त्याचे पोटात एक गाठ उत्पन्न झाली. ती फार कठिण होती व तिच्यापासून त्यांना फार त्रास होऊं लागला. मुंबईस एक दोन प्रसिद्ध डॉक्टरांना दाखविली पण कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें त्यांना महाराजांकडे जाण्याविषयीं एका गृहस्थानें सुचविलें. अर्थात तशा स्थितींत जाणें शक्य नव्हते. ते म्हणाले महाराजांचे आशिर्वादानें ही गांठ फुटून आंतला रोग मळाच्या द्वारानें जाईल तर मला बरें वाटेल व मी महाराजांकडे जाऊं शकेन. त्यांवर त्या गृहस्थानें त्यांना महाराजांची उदी दिली, व तिचें त्यांनीं सेवन केलें व दुसरेच दिवशीं सकाळीं गांठ फुटून आंतला पू शौचाच्या द्वारानें जाऊं लागला व दोन चार दिवसांत त्यांना बरें वाटू लागलें. मग लौकरच ते महाराजांचे दर्शनास गेले.

बाईस होऊं लागल्या यातना । काय करावें कांहीं सुचेना ॥
सुरुवें चालली बाबांची प्रार्थना । त्यावीण कवणा करुणा ये ॥१५६॥
धांवूनी आल्या शेजारणी । घालूनि बाबांना गाऱ्हाणीं ॥
पत्नीनें प्याल्यांत ओतूनी पाणी । उदी कालवूनी पाजिली ॥ १५७॥
पांच मिनिटें गेलीं न गेलीं । तोंच बाईची सुटका झाली ॥
गर्भस्थिती निर्जीव दिसली । गर्भांच मुकली चैतन्या ॥ १५८ ॥
असो गर्भाची कर्मगती । होईल पुढारा गर्भप्राप्ती ॥
बाई पावली भयनिर्मुक्ती । लाधली संस्थिती सौख्याची ॥ १५९ ॥
वेदना विरहित गर्भ स्त्रवली । हातीं पायीं सुखें सुटली ॥
महच्चिंतेची वेळ टळली । ऋणी झाली जन्माची ॥ १६० ॥
पुढील अध्याय याहून गोड । परिसतां पुरेल श्रोत्यांचें कोड ॥
निरसूनि चिकित्सकपणाची खोड । भक्तीची जोड लाधेल ॥ १६१॥
आम्हा निराकाराची उपासना । आम्ही देणार नाहीं दक्षिणा ॥
आम्ही वाकविणार नाहीं माना । तरीच दर्शना येऊं कीं ॥ १६२ ॥
ऐसा जयांचा कृतनिश्चय । तेही पाहतांच साईचे पाय ॥
दक्षिणेसहित साष्टांग काय । वाहती हा काय चमत्कार ॥ १६३ ॥
उदीचाही अपूर्व महिमा । नेवासकरांचा भक्तिप्रेमा ॥
कैसें दुग्ध पाजूनी भुजंगमा । गृहस्थधर्मा संरक्षिलें ॥ १६४ ॥
ऐसऐसिया कथा उत्तम । परिसतां उपजेल भक्तिप्रेम ॥
संसारदुःखा होईल उपशम । याहूनि परमसुख काय ॥ १६५ ॥
म्हणोनी हेमाड करी विनती । साईचरणीं करोनी प्रणती ॥
प्रेम धाजी श्रोतयांप्रती । निज सच्चरितीं रमावया ॥ १६६ ॥

स्वस्ति श्री संतसज्जनप्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थसच्चरिते । उदीमहिमा नाम
चतुस्त्रिंशत्तमोऽध्यायः संपूर्णः ॥
॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभंभवतु ॥

[illegible]

# श्री साईलीला

मासिक पुस्तक

वर्ष ३ रें. ] मार्गशीर्ष शके १८४७ [ अंक ९ वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवितमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| स्फुट विषय ... .. .. ... .. | २८९-३०२ |
| महाराजांचे अनुभव ... ... .. .. | ३९९-४०२ |
| श्री साईसच्चरित ... ... ... ... | ५८९-६१० |


## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हे मासिक सुरू करण्यात याच्या चालकाचा हेतू याची छपाई व खर्चवेच भागून राहिलेले उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनात आणल्यास आपापल्या स्नेह्यांमधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचे श्रेय घेतल्यास एकंदरीने कितीतरी मदत केल्यासारखे होणार आहे. -शिवाय अशा रीतीनें मदत करणाऱ्याने श्रीसाईसमर्थांची पर्यायाने सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टात पडतील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टात क्वचित् अंक गहाळ होत असतो व यामुळे जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हा अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधाने पत्रव्यवहार करणे तो खालीं सही करणार याचे नावाने खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

श्रीसाईलीला ऑफिस, ५ सेंट मार्टिन्सरोड, बांद्रे बी. बी. सी. आय. रेल्वे.

## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरने अगाऊ रु.३।=व्ही. पी. ने रु. ३।। चालू अंक -।= मागील अंक शिल्लक असल्यास -।।

पूर्वीच्या अंकात व्ही. पो. ने रु. ३।।= चुकून छापलें गेलें. असेंच यंदा ज्या कांहीं वर्गणीदारांकडे रु.३।।। ची व्ही पी. चुकून गेली, त्यांचे -।- आमचेकडे जमा आहेत. अशा वर्गणीदारांनीं -।- परत मागितल्यास पाठवून देऊं.

शके १८४७ वैशाख व ज्येष्ठाचा जोड अंक नं. २-३ आणि आषाढचा अं ४ यांत श्रीसाईबाबांच्या छापलेल्या फोटोच्या कांहीं प्रतीसाठीं मागणी आल्यावरून त्या प्रत्येक फोटोच्या १०० प्रती छापवून तयार आहेत. ज्या कोणा स त्या संग्रहीं ठेवण्याची इच्छा असेल त्यानें प्रत्येक प्रतीसाठीं ८२ चीं तिकीटें व आपला पत्ता पाठवावा म्हणजे हे फोटो त्यांजला बु.पो.ने पाठविण्यांत येतील.

## श्रीदत्तज्ञानसाइराजायनमः

सप्रेम सा. न. वि. वि. आपल्या सुंदर विबुधमान्य श्रीसाईलीलेच्या एखादे अंकीं खालील मजकुरास व अनुभवांस कृपा करून स्थल द्यावे अशी सविनय प्रार्थना आहे

आपण म्हणतां श्रीसाईलीला आता बंद पडण्याची वेळ आली आहे. कारण कोणी अनुभव लिहून पाठवीत नाहींत. पण मला ही गोष्ट खरीच वाटत नाहीं. बाबांनीं भक्तोद्धाराकरितांच फक्त मानव-तनू धारण केली होती; परंतु ते मानव नव्हते. ते साक्षात् सच्चिदानंद परब्रह्म परमात्मा सगुण दत्त-ज्ञानावतारमूर्ती होते. ते जगदात्मे होते. ते अनंतबाहू होते. ते होते असें नव्हे; तर ते भक्त भावनेप्रमाणें व श्रीमद्भगवद्गीतेत गाइल्याप्रमाणे " अनेक-बाहूदरवक्त्रनेत्रं, नांतं न मध्यं न पुनस्तवादिम्, अनादिमध्यांतमनंतवीर्यम्, अनंतबाहुं शशिसूर्यनेत्रम् " व्यक्ताव्यक्त, मूर्तामूर्त, दृश्यादृश्य स्वरूपांत आहेत, व यापुढेंही ते या स्वरूपांत अनंत काल राहणारच. आपलें लीला-नाटक अनंत बाहूंनीं करीत रहाणार. भक्तांच्या ठिकाणीं त्यांच्या लीला आप-लेकडे पाठविण्यांत थोडेसे सकारण वा निष्कारण शैथिल्य दिसत असेल. परंतु एकदां भक्तजनास, अनंत हस्तांनीं अनंत लीला करणाऱ्या अनंतवीर्य श्री सद्गुरुराजांची आज्ञा व स्फूर्ती झाल्यानंतर बिचारे भक्तजन आपल्या दोन हातांनीं, नव्हे एकेकच हाताने आपले लीलानुभव लिहिणार किती! बाबांचा भक्तवृंद आपल्या यादीवर लिहिलेला इतका अल्पसंख्याक नाहीं. श्रीमद्भग-वद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें, " नांतोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप". बाबांच्या पुण्यलीला अनंत आहेत, व त्यापासून ज्ञान उत्पन्न होऊन त्या ज्ञानाचा अनुपमेय अनुभव घेणारे भक्तजनही अनंत आहेत. हल्लीं यादीवर असलेल्या भक्तजनांच्या संख्येपैकीं एक-दशांशानीं श्रीसाईलीलेच्या प्रत्येक अंकास फक्त एकेकच अनुभव देण्याचें जरी मनांत आणलें, तरी सुद्धां श्रीसाईलीला कमीत-कमी दहा वर्षें तरी बंद पडणार नाहीं. मग असंख्य भक्तांस स्फुर्ति झाल्यास, आपल्यासही बाणासुराचा, कार्तवीर्याचा किंवा निदान श्रीरामद्वेष्ट्या वीस भुजा

रावणाचा अवतार घेऊन बाबाचे लीलाकृत्य छापून काटऱ्याचे विकट पण गोड काम करावे लागेल. असो. भक्तजनांच्या ठिकाणीं लीलानुभव लिहिण्याचे चैतन्यच नाहीं असे नाहीं. चैतन्य आहे, फक्त चैतन्यास चेतना नाहीं. आपण मधून मधून चेतना देण्याचे आपले पवित्र कर्तव्य बजावित आहां तथापि प्रसिद्ध कविवर्य व नाटकाचार्य श्रीकालिदास कवींच्या अभिज्ञान शाकुंतलातील ६ वे अंकातील ३१ वे श्लोकात वर्णन केल्याप्रमाणे—ज्वलति चलितेन्धनोऽग्निर्विप्रकृत: पन्नग: फणा कुरुते"; आपण प्रत्येक अंकीं स्फूर्तिदायक व चेतनात्मक कांहीं लेख लिहून भक्त-जनांच्या कर्तव्यबुद्धिरूप इंधनाग्नीवर जी थोडीशी शैथिल्यरक्षा आलेली दिसते ती इंधने हलविल्यास, किंवा भक्तजनकर्तव्यरूप पन्नग किंचित् निद्रावस्थेस जाऊन त्याचे ठिकाणीं थोडें शैथिल्य आल्यासारखें वाटते त्यास डवचल्यास ती रक्षा जाऊन तो अग्नी प्रज्वलीत होईल, किंवा ती निद्रावस्था व तिजबरोबर असणारे शैथिल्य जाऊन तो उरगही आपली फणा काढून फूत्कार करूं लागेल.

वर लिहिल्याप्रमाणे सर्व भक्तगणांनीं मनावर घेतल्यास श्रीसाईलीला चिरायू झाल्यावाचून राहणार नाहीं. ह्या लीलामाई आतांच कोठेशा रांगू लागल्या आहेत. त्या आपल्या कामधेनू आहेत. त्या आपल्या बालमंदारलता आहेत. त्या चमत्कार-चिंतामणी आहेत. त्या चमत्कार-विद्युल्लता आहेत; त्या अनंत भगिनी आहेत. त्या अनंत माऊल्या आहेत. दिवसेंदिवस त्या चंद्रकलेप्रमाणे वाढतच जाणार. पण पौर्णिमेस पूर्ण व अमावास्येस शून्य अशातला त्यांचा प्रकार नाहीं. त्याही बाबांप्रमाणें त्रिभुवनैक व्याप्त असून अनंतकाल वृद्धिंगतच होत रहाणार. बाबांच्या चरित्ररत्नाकरांतील त्या अमूल्य रत्नें आहेत. त्या अमृतमय अतएव अप्रतिम स्वादु आहेत. त्या कर्णसुभग आहेत. त्या कर्णानें प्राशन करून मनानें पचविण्याच्या आहेत; त्या अवीट आहेत. त्यांचें नित्य यथेच्छ अशन व प्राशनानें भक्तांस कधींही मोडशी होत नाहीं, अपचन होत नाहीं. उलट भवरोगामुळें कृश झालेली

भक्तकाया पीवर होऊन तिला बाबाच्या कृपेचे बाळसें चढतें, व रोगानें गलितालक झालेल्या तिच्या मस्तकावर नूतन कुटिल कुंतल-दिव्यज्ञानांकुर दृग्गोचर होतात.

जशा लीला अगणीत व अनुभव अगणीत तसे त्यांचे प्रकारही असंख्य. त्यांची विवक्षित जाती नाहीं. त्या हिंदु आहेत, मुसलमान आहेत, पार्शी आहेत, ख्रिस्ती आहेत. त्यांना विवक्षित काल नाहीं, त्यांना विवक्षित देश नाहीं, त्यांना विवक्षित पात्र नाहीं हिमालयापासून रामेश्वरापर्यंत व द्वारकेपासून जगन्नाथापर्यंत त्या आर्यावर्तावरील सर्व भागावरील सर्व जातींत, सर्व कालीं व सर्व सजीव व निर्जीव प्राण्यांत दृग्गोचर होतात. तशाच त्या वाटेल तो वेष धारण करतात. कधीं त्या कंगाल दरिद्र्याच्या झोंपड्यांत दिसतील, तर कधीं त्या अलोट संपत्तिमान् गृहस्थाच्या सात मजली वाड्यांतही दृष्टीस पडतील. कधीं त्या पुरुषाचा वेष घेतील, तर कधीं त्या स्त्रीचा वेष धारण करतील. कधीं भिकाऱ्याचा, तर कधीं संन्याशाचा वेष घेतील. कधीं गलित कुष्टरोग्याचा, तर कधीं सत्पात्र ब्राह्मणाचा वेष घेतील. कधीं यजमानाचा, तर कधीं नोकराचा वेष घेतील. कधीं शंकराचा तर कधीं गणपतीचा; कधीं रामाचा तर कधीं दत्ताचा; कधीं हमालाचा, तर कधीं इतर साधुसंताचा वेष धारण करतील. कधीं शिशूचा तर कधीं वृद्धांचा वेष घेतील. कधीं आंग्लविद्याविशारदांच्या लेखन, पुराण, व्याख्यानांत नजरेस पडतील, तर कधीं अविद्यपुरुषांच्या लेखणींत व वाचेंतही दिसतील. कधीं साईभक्तपरायण बोवांच्या कीर्तनांतही वावरतील, तर कधीं काकासाहेब दीक्षितांच्या मोलकरणीच्या मुखांतून निघालेल्या सहज वृत्तीच्या ग्राम्य गायन लकेरींतही खिदळतील. कधीं शेट सावकारांत, तर कधीं व्यापारी मंडळींत, कधीं खालच्या नोकरांत, तर कधीं उच्च दर्जाच्या व उच्च अधिकृत मंडळींतही दिसतील. सारांश, त्या कुठें अवतीर्ण होतील व कुठें भरारी मारतील याचा नेमच नाहीं. कधीं अश्वांत दिसतील तर कधीं म्हशींतही दिसतील. कधीं सर्पासारख्या भयंकर प्राण्यांत, तर कधीं क्रूर व

हिंस्र अशा व्याघ्रातही वस्ती करतील, कधीं पृथ्वीतत्त्वांत वसतील, तर कधीं आपतत्त्वास चिकटून राहतील.कधीं अग्नितत्त्वात तर कधीं वायुतत्त्वांत आविर्भूत होतील. कधीं सुस्वरूप धारण करतील तर कधीं अगदीं कुरूप स्थितींत दिसतील. कधीं मधुर वचनात दिसतील, तर कधीं गालीप्रदानांत दिसतील. कधीं ताडनांत दिसतील, तर कधीं पश्चात्तापानंतर प्राप्त झालेल्या शांत स्वरूपांत दिसतील. कधीं नुसत्याच कोपांत, तर कधीं हास्यविनोदातही नजरेस येतील, कधीं जागृतींत, तर कधीं स्वप्नांतही पुढे येऊन उभ्या राहतील.

महाराजाच्या ज्ञानमूर्तीसंबंधाने, त्यांच्या अमोल लीलासंबंधानें व व्यावहारिक व पारमार्थिक अनुभवांसबंधाने जितके लिहावें तितकें थोडेंच होणार आहे. प्रत्यक्ष वेद जेथे मौनावतात, सहस्त्रजिव्हा शेष जेथें हात टेकतात व जगज्जनक चतुराननाची अमोघ लेखणी जेथें बोथट होते तेथे अल्पमति मानव किती लिहिणार ! तथापि आपण आपल्या दैवी, रसाळ व प्रतिभासंपन्न वाणीने त्याच्याच प्रेरणेनें व कृपेनें बाबांचे छोटेसें पद्यात्मक चरित्र प्रत्येक अंकीं देऊन श्रीलीलामाईवर प्रेमालंकार चढवून तिचा अंक सुशोभित करीतच आहां; तथापि प्रथम श्रोत्रसुभग, महाप्रतापी, ओजस्वी व तारुण्यबलानें मुसमुसलेल्या अतएव सदैवप्रबल वेगवत्या अशा ज्ञान, लीला, अनुभवरुपी तीन महापुण्यसरित्संगम प्रयागांत व शेवटीं बाबाच्या मधुर, गंभीर व विस्तृत गद्यपद्य चरित्र महारत्नाकरांत यथेच्छ अवगाहन व मज्जन करण्याची सुदुर्दमनीय लालसा पुरी झाल्यावांचून श्रीसाईलीला बंद करणे केव्हाही श्रेयस्कर नाहीं. त्या प्रयागाचे व रत्नाकराचें दर्शन होण्यासच फार काल लागणार आहे. मग त्यांत अवगाहन व मज्जन करण्याची सुसंधी येण्यास श्रीसद्गुरुरायाची परम कृपाच पाहिजे. तथापि साईभक्तांनी कमर बांधल्यास हेंही दुर्घट काम ' मूकं करोति वाचालं पंगु लंघयते गिरिम्' या न्यायानें सुकर झाल्यावांचून रहाणार नाहीं. बाबा त्यास स्फूर्ति देतील व मदतही करतील. काम त्यांचें व भक्तही त्यांचेच. निराश होण्याचें कारण नाहीं. कालांतराने चरित्र जरी तयार झालें तरी श्रीसाईलीलामाईही श्रीगीतादेवीप्रमाणे नित्य नवी व टवटवीतच रहाणार.

हिंस्र अशा व्याघ्रातही वस्ती करतील. कधीं पृथ्वीतत्त्वात बसतील, तर कधीं आपतत्त्वास चिकटून राहतील. कधीं अग्नितत्त्वात तर कधीं वायुतत्त्वांत अविर्भूत होतील. कधीं सुस्वरूप धारण करतील तर कधीं अगदीं कुरूप स्थितींत दिसतील. कधीं मधुर वचनात दिसतील, तर कधीं गालीप्रदानांत दिसतील. कधीं ताडनांत दिसतील, तर कधीं पश्चात्तापानंतर प्राप्त झालेल्या शांत स्वरूपांत दिसतील. कधीं नुसत्याच कोपात, तर कधीं हास्यविनोदातही नजरेस येतील. कधीं जागृतींत, तर कधीं स्वप्नांतही पुढे येऊन उभ्या राहतील.

महाराजाच्या ज्ञानमूर्तीसंबंधाने, त्यांच्या अमोल लीलांसंबंधानें व व्यावहारिक व पारमार्थिक अनुभवांसंबंधाने जितके लिहावें तितकें थोडेंच होणार आहे प्रत्यक्ष वेद जेथे मौनावतात, सहस्रजिव्हा शेष जेथें हात टेकतात व जगज्जनक चतुराननाची अमोघ लेखणी जेथें बोथट होते तेथे अल्पमति मानव किती लिहिणार ! तथापि आपण आपल्या दैवी, रसाळ व प्रतिभासपन्न वाणीने त्याच्याच प्रेरणेने व कृपेनें बाबांचें छोटेसें पद्यात्मक चरित्र प्रत्येक अंकीं देऊन श्रीलीलामाईवर प्रेमालंकार चढवून तिचा अंक सुशोभित करीतच आहां; तथापि प्रथम श्रोत्रसुभग, महाप्रतापी, ओजस्वी व तारुण्यबलानें मुसमुसलेल्या अतएव सदैवप्रबल वेगवत्या अशा ज्ञान, लीला, अनुभवरूपी तीन महापुण्यसरित्संगम प्रयागात व शेवटीं बाबाच्या मधुर, गंभीर व विस्तृत गद्यपद्य चरित्र महारत्नाकरांत यथेच्छ अवगाहन व मज्जन करण्याची सुदुर्दमनीय लालसा पुरी झाल्यावांचून श्रीसाईलीळा बंद करणे केव्हांही श्रेयस्कर नाहीं. त्या प्रयागाचे व रत्नाकराचें दर्शन होण्यासच फार काल लागणार आहे. मग त्यांत अवगाहन व मज्जन करण्याची सुसंधी येण्यास श्रीसद्गुरुरायाची परम कृपाच पाहिजे. तथापि साईभक्तांनीं कमर बांधल्यास हेंही दुर्घट काम ' मूकं करोति वाचालं पंगु लंघयते गिरिम्' या न्यायानें सुकर झाल्यावांचून रहाणार नाहीं. बाबा त्यास स्फूर्ति देतील व मदतही करतील. काम त्यांचें व भक्तही त्यांचेच. निराश होण्याचे कारण नाहीं. कालांतरानें चरित्र जरी तयार झालें तरी श्रीसाईलीलामाईही श्रीगीतादेवीप्रमाणे नित्य नवी व टवटवीतच रहाणार.

अनुभवाव्यतिरिक्त महाराजांबद्दल काय-काय व किती किती लिहितां येईल तें माझ्या अल्पसमजुतीप्रमाणें स्थूलदृष्ट्या मी खालीं देत आहे.

१. दिव्य व पुण्य महासरित् श्री गोदावरीमाई— जिच्या सान्निध्य अथवा जिच्या काठीं श्री क्षेत्र शेरडी वसलेलें आहे, त्या महानदीचा "गोदावरी महात्म" व "सिंहस्थ महात्म" यांत वर्णिलेला हृदयंगम इतिहास बाबांनीं या महापुण्य नदीचे तीरींच का निवास केला, हें या महात्मद्वयावरून चांगलेच प्रत्ययास येतें. पौराणिक अतएव त्यातील कांहीं भाग अतिशयोक्तीचा किंवा अविश्वसनीय मानला, तथापि भूगोलदृष्ट्या तिची उत्पत्ती, काल व तिचा विस्तार या संबंधाचे वर्णन तिचे अद्वितीय श्रेष्ठत्व सिद्ध करून बोधप्रद झाल्यावांचून रहात नाहीं. मला तर त्यांत फार बहार वाटतें. गोदावरी, गंगा, यमुना, सरस्वती, भीमा, तुंगभद्रा आदीकरून द्वादशनद्यांचा परस्पर संबंध अगर नातें काय आहे, त्यांची विभागणी उत्तर, मध्य, व दक्षिण हिंदुस्थानांत कशी झाली आहे, ती कोणीं, केव्हां व कशाकरितां केली आहे, गोदावरीस वृद्धगंगा असे नांव कां दिले अथवा मिळाले, तिच्या पुण्यत्वामुळे तिच्या तीरावरील खेड्यांस व नगरांस क्षेत्रत्व कसें प्राप्त झालें, हें त्या वर्णनावरून स्पष्टपणें ध्यानांत येते. कोपरगांवास गोदावरी असतां ती शेरडीस केव्हां व कशी आली याबद्दल बाबांच्या अवर्णनीय लीलेचें परम कौतुक वाटते.

२. शेरडी गांवाबद्दलही पुष्कळ माहिती मिळवून लिहिण्यासारखी आहे. शेरडी हा शब्द सार्थ आहे किंवा कसें ? असल्यास तो कसा तयार झाला ? त्याचा संस्कृत शब्द "शालधी, शैलद्रि, सैरंध्री वा सैरिध्री" यांच्याशी संबंध आहे कीं काय ? हा शब्द मराठी आहे का फारशी आहे, गुजराथी आहे का काठेवाडी आहे, का संस्कृताचा अपभ्रंश आहे ? त्याचे अर्थावरून काय बोध होतो ? हा गांव कोणीं, केव्हां व कशाकरितां वसविला हा गांव मूळ कोणाचा ? यांत मूळ वस्ती कोणाची ? या गांवास त्याचा स्वतांचा कांहीं इतिहास आहे कीं नाहीं ? असल्यास तो काय ? महाराजांनीं हाच गांव पसंत कां केला ?

३. शेरडींतील बाबांची बसण्याची मशीद. ही मशीद कोणी, केव्हां, कोणाकरिता अगर कशाकरिता बांधिली ? मशीदींतील बाबांच्या वेळच्या वस्तू, धुनी, धुनीची लाकडे व गोंवऱ्या, चिलीम, जाते, तुरबत, टम्रेल, तमाखू व छापी, बाबाचा जोडा वगैरे.

४. साठे साहेबाच्या नव्हे, आतां नवलकर साहेबाच्या वाड्याचे अंगणातील लिंबाचा वृक्ष. तो कोणी, केव्हां व कशाकरितां लावला. त्याचा इतिहास. त्याचा बाबाशीं संबंध.

५. शेरडींतील लेंडी ओढा. लेंडी नाव कसें पडले ? लेंडीशीं बाबांचा संबंध. लेंडीवरील काहीं जागा. लेंडीवरील बाबांची बाग.

६. राहतें गांव व तेथील मारवाडी,—ज्यांचे घरीं बाबा कधीं कधीं जात, बसत व परत येत. शेरडी, राहते, राहत्याचे मारवाडी व बाबा यांचा परस्पर संबंध. " राहते " या शब्दाची व्युत्पत्ती व राहते गांवचा इतिहास.

७. कै. भक्त शिरोमणी रा. रा. नानासाहेब चांदोरकर, कै. कृपापात्र व बाबाचे बालपणापासूनचे परमभक्त म्हाळसापति, कृपापात्र बालकराम, मुक्ताराम, नानासाहेब निमोणकर, मेघा, तात्यासाहेब नूलकर, दादासाहेब केळकर, बाळासाहेब भाटे, श्री० बापूसाहेब बुटी. बडे बाबा, सौ. जोग आई, राधाकृष्ण, तात्या पाटोल, कोते यांची आई, अण्णा चिंचणकर, वगैरे मंडळींचा व महाराजांचा अनेक पण निरनिराळ्या तऱ्हेचा संबंध. बाबांनीं सांगितलेल्या व त्यांचेकडून करवून घेतलेल्या कामगिऱ्या.

८ शेरडी संस्थानची कच्ची विस्तृत हकीकत. महाराजांचें हयातींतील व समाधिस्थ. झाल्यानंतरची श्रीसाईलीलेंत वेळोवेळीं स्फुट रीतीनें प्रसिद्ध झालेली ती एके ठिकाणीं संकलित लिहिण्यासारखी आहे. संस्थानचे चालक, व्यवस्थापक व व्यवस्था.

९ शेरडी संस्थानांतील चार उत्सव कधीं व कसें सुरू झाले व हल्लीं ते कोणत्या स्वरूपांत आहेत व कोणाचे देखरेखीखालीं चालतात व ते कोणी कोणी पत्करले आहेत.

१० संस्थानचे जमाखर्चाची व्यवस्था, नोकर चाकर लोकांच्या नेमणुका, त्यांचे पगार, त्यांच्या कामगिऱ्या व त्याच्यावरील देखरेख.

११ संस्थानची स्थावरजंगम मिळकत व कायम फंड, मासिक व ऐच्छिक वर्गणी. त्याचा जमाखर्च, त्याची व्यवस्था व त्याजवरील देखरेख.

१२ बाबांचे फोटो, बाबांचा घोडा, बाबाची समाधि. समाधिसंबंधाने, स्नान, अभिषेक, पूजा, धूप, दीप, नैवेद्य, दक्षणा, नंदादीप, चौघडा, आत दर्शन, समाधि स्पर्शन वगैरेची हकीकत. मंदिरातील समाधीजवळ ठेवलेले व मशीदींत ठेवलेल्या पेट्यांतील पैशांची व्यवस्था.

१३. बाबांचा दररोजचा दिवसाचा व रात्रीचा वर्तनक्रम.

१४ बाबांचा वेष, डोक्याचें फडके, अंगांतील कफनी व नेसण्याची लंगोटी.

१५. बाबांचे सकाळचे उठणें. लघुशंका, शौचविधी, तोंड धुणें, स्नान करणे, आसनावर बसणें.

१६ बाबांची भिक्षा, बाबाची न्याहारी.

१७ बाबांच्या फाऱ्या, बाबांचे सकाळ संध्याकाळचे विवक्षित जागीं व विवक्षित वेळीं फिरणे व हातवारे करणें, विवक्षित गृहस्थांशीं बोलणें, लेंडीवर जाणे, शौचविधी करणें व बागेंतील झाडांस स्वतः पाणी घालणें व त्यांस कुरवाळणें.

१८. लेंडीवरून परत आल्यावर मशिदींतील आसनावर बसणें, भक्तजनांस दर्शन प्रसाद देणे, त्यांच्या मनीषा तृप्त करणें, त्यांच कामाचा उलगडा करणें.

१९. बाबा व पूजा व आर्ती.

२०. बाबा व फळफळावळ, नैवेद्य व भिक्षा.

२१. बाबा व खाणें. ( युक्ताहार विहारस्य )

२२. बाबा व कफन्या व चिलमी.

२३. बाबा व श्रीरडी.

२४. बाबांचे निजणे व फळी.

२५. बाबांवरील आक्षेप.

१ बाबा दक्षणा मागतात.

२ बाबांचे जवळ राधाकृष्ण कशाला ?

३ बाबा मुसलमान आहेत.

२६. बाबांचे दातृत्व, सर्व प्राणीमात्रावर समदृष्टी, जातिभेदाभाव.

२७. बाबांचा राग, गालीप्रदान, ताडण व त्यावेळीं तोंडातले तोंडात म्हणत असलेला महामंत्र. अनुराग, भक्तवात्सल्य, कळकळ,सर्वभूतहितैक दृष्टी.

२८. बाबा हिंदु का मुसलमान ? हिंदु असतील तर ब्रह्मचारी, गृहस्थाश्रमी का संन्यासी. ?

२९. बाबा शास्त्री का पंडित, मुनी, तपी, व्रती, योगी, सिद्ध का ब्रह्मनिष्ठ का कवी ?

३०. बाबा वैद्य का मांत्रिक का गारुडी ?

३१. बाबा देव का परब्रह्म ?

३२. बाबा व ब्रह्मज्ञान. द्वैत का अद्वैत ?

३३. बाबा व त्यांचें नांव, जाति, कुल व गोत्र, जन्मठिकाण, पूर्वपरंपरा.

३४. बाबा व साधुपरीक्षा.

३५. बाबा व लहानपण, मोठेपण, वेड, स्वार्थ वगैरे. ( अल्ला मालिक. "अमानित्वं" श्री गीता. )

३६. बाबांची योग्यता, किंमत, ऐश्वर्य, सामर्थ्य, ( फळी, पाण्याच्या पंत्या, प्रिटोरिया, वाटेल तो देह धारण करणें वगैरे. )

३७. बाबा व इतर तत्कालिन व पूर्वकालिन साधुसंत. बाबांचा व त्यांचा संबंध. त्यांच्यावरील प्रभुत्व व छाप. बाबांचें तारायंत्र ( श्री समर्थ तुकाराम, पद्मालय महाराज, बन्नुमाई वगैरे. )

३८. बाबा व भक्तिज्ञान, वैराग्य.

३९. बाबा व श्री गीता. ( कै. नानासा. चांदोरकर )